# कुलाब्याची दांडी

**ना. सी. फडके**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**कुलाब्याची दांडी : ना. सी. फडके**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१३

**किंमत**
₹ २७०/-

# कुलाब्याची दांडी

## प्रकरण पहिले

# रहित झालेले वनभोजन

### १

माझा स्वतःचा काही ज्योतिषावर विश्वास नाही.; पण झालेल्या गोष्टींकडे मागे वळून पाहिले की आमच्या बाबांचे भविष्य खरे ठरले असे कबूल करणे भाग पडते. माझी इंटरमीजिएटची परीक्षा पास होऊन मी लवकरच बी. ए.च्या अभ्यासासाठी पुण्यास जाणार म्हणून मुंबईच्या दुकानाचे काम दिवाणजींवर सोपवून बाबा जेव्हा वृंदावनास पाच सहा दिवस आले होते त्याच वेळी एकदा ते मला म्हणाले होते की ''जगदीश, तुझी ही तिसरी परीक्षा उत्तम प्रकारे पार पडली याने मला फार आनंद झाला. आपल्यासारख्या श्रीमंत माणसांनादेखील परीक्षा देता येतात ही गोष्ट सिद्ध करावयाची झाल्यास आता तुझ्याकडे मला अभिमानाने बोट दाखविता येईल; पण एक मात्र मला काळजी वाटते. तुझ्या पत्रिकेवरून असं दिसतं की पुढचं दीड वर्ष तुला फार वाईट आहे; तेव्हा आता परत कॉलेजात गेल्यावर जरा नीट काळजीनं वाग.''

त्या वेळी बाबांचे ते शब्द ऐकून मला मनातल्या मनात हसू आले; परंतु माझ्या चरित्रातील त्या दीड वर्षाच्या भागाचा एकंदर विचित्र इतिहास जेव्हा जेव्हा मनात येतो तेव्हा तेव्हा त्या वेळच्या त्या माझ्या हसण्याचेच मला हसू येते. गोष्टी झाल्याच मुळी तशा. त्या दीड वर्षाच्या हकीगतीचा विचार करीत बसलो, की माझ्याच का आयुष्यातील ते दिवस अशी मलाच कित्येक वेळा शंका येते. त्या दिवसांचा अंत

माझ्या विवाहात होऊन त्याचा माझ्या परम प्रिय पत्नीशी कायमचा संबंध जडलेला असल्यामुळे त्यांच्या सत्यत्वाविषयी मला फार वेळ शंका घेता येत नाही. तिला पाहिली, की तिच्या मागे ते दिवस उभे असल्यासारखे मला वाटते. मी चितारी असतो आणि माझ्या प्रिय पत्नीचे यथातथ्य चित्र मला काढावयाचे असते, तर त्या दिवसांचे रंग फासून मी चित्राची पार्श्वभूमी तयार केली असती आणि तसले चित्र नाही तर निदान शब्दचित्र तरी काढून आपल्याच आयुष्यातील एका भागाचे दृश्य दुरून पाहण्याचे सौख्य अनुभवता आले तर पाहावे म्हणूनच मी लेखणी हाती घेतली आहे.

१९१४ सालच्या जानेवारी महिन्यात मी कॉलेजात येऊन बी. ए.च्या वर्गात नाव दाखल केले, आणि–

पण, मला वाटते त्या सबंध दीड वर्षाच्या हकीगतीचा पसारा वाचकांपुढे मांडण्यापेक्षा त्यातील शेवटच्या काही महिन्यातील गोष्टी सांगणेच अधिक बरे!–हो, त्याच दिवसापासून प्रारंभ करतो. कारण, त्याच दिवसाचा ठसा माझ्या मनावर अतिशय उमटलेला आहे. तो दिवस मी कधीही विसरणार नाही.

ती १९१५ च्या जानेवारीची पहिली तारीख होती. आम्हा हिंदूंच्या कालगणनेच्या पद्धतीप्रमाणे त्या दिवसाला काहीच महत्त्व नव्हते; पण कॉलेजातील फॅशनेबल मुलांचा मी पुढारी. मला त्या पद्धतीपेक्षा इंग्रजी कालगणनाच अधिक प्रिय होती. नव्या वर्षाचा नवा दिवस तो! आमच्या चैनीच्या समुद्राला त्या दिवशी भरती आली तर त्यात नवल कसचे? शिवाय, तो दिवस मला प्रिय वाटण्यास आणखीही एक कारण होते. माणिक व मी आज संध्याकाळी एम्प्रेस गार्डनमध्ये वनभोजनास जाणार होतो. आमचा स्नेह जमाल्याला नाही म्हटले तरी पाच महिने होऊन गेले होते व तेवढ्या अवधीत आम्ही एकमेकांकडे किती वेळा आलो गेलो असू, किती नाटके पाहिली असतील, किती वेळा 'बोटिंग' (नौकाविहार) केले असेल त्याला गणतीच नाही. पण आमच्याबरोबर बाळासाहेब म्हणा, आबासाहेब म्हणा किंवा माणिकची थोरली बहीण मालतीबाई म्हणा, तिसरे कोणी तरी असावयाचेच आणि अशा वेळी 'दोघांत तिसरा आला की गर्दी वाटू लागते,' या इंग्रजी म्हणीचा मला व माणिकला नेहमी प्रत्यय येत असे. आज मात्र मी अशा काही कुशलतेने एकंदर गोष्टी जुळवून आणल्या होत्या की वनभोजनाच्या आमच्या



कार्यक्रमात तिसऱ्या कोणाचीच गर्दी व्हावयाची नव्हती. मी आणि माणिक! माणिक आणि मी! तिसरे कोणी नाही!

त्या एकांतमय वनभोजनाची कल्पनाच मला इतकी रम्य वाटत होती, की आदल्या रात्री मला काडीइतकीदेखील झोप आली नाही. अथांग समुद्रात एकच लहानशी नौका तरंगत असावी त्याप्रमाणे मी आणि माणिक वनभोजनाच्या निमित्ताने अथांग चांदण्याच्या पृष्ठभागावर विहार करणार या आशेने माझी झोप पार नाहीशी झाली. त्या एकांताच्या अवधीत आज कित्येक दिवस दडपून ठेवलेले माझ्या प्रेमाचे बोल कोणत्या रूपाने प्रगट होतील, त्यांचा माणिकवर काय परिणाम होईल, माझ्या अदमासाप्रमाणे माणिक वागेल की माझ्या सर्व आशा ती मानेच्या झटक्याने किंवा नापसंती दर्शविणाऱ्या एकाच कटाक्षाने उन्मळून टाकील, असे नानाप्रकारचे विचार, विकार व संशय त्या रात्री माझ्या मनात पुनःपुन्हा उत्पन्न होत, विलीन झाल्यासारखे वाटत; पण पुन्हा आपला खेळ सुरू करीत.

शेवटी कॉलेजच्या पहाऱ्यावर पाचाचे ठोके पडलेले ऐकून मी अंगावरचे पांघरूण फेकून दिले, उठलो व चूळ भरावयासाठी खिडकीत गेलो. गार वाऱ्याची झुळूक अंगावरून गेली. बाहेर स्फटिकासारखे शुभ्र चांदणे पडलेले दिसले. कॉलेजच्या आवारातील वेलीवरील अर्धविकसित फुलांचा मधुर वास आला. समोरच्या पिंपळावरील पक्ष्यांची किलबिल ऐकू आली. लांब कोठे तरी एका झोपडीत कोणी स्त्री गाणे म्हणून दळत होती. तिच्या गाण्याचा अस्पष्ट आवाज कानावर आला. रात्रभर ज्या प्रणयविचारांनी माझ्या मनात कल्लोळ उडवून दिला होता ते क्षणभर एकाएकी लुप्त झाले. त्या पहाटेच्या देखाव्याकडे पाहात मी तटस्थ उभा राहिलो. आम्हा फॅशनेबल विद्यार्थ्यांमध्ये उशिरा उठण्याबद्दल अहमहमिका असे व सर्वांपेक्षा अधिक उशिरा उठण्याबद्दल माझी कीर्ती होती. पहाटेच्या प्रहरी सृष्टीचे स्वरूप कसे असते याची मला कल्पनादेखील नव्हती. यामुळे अगदी अपरिचित अशी एखादी सुंदर वस्तू दृष्टीस पडली, की मनुष्याची जी स्थिती होते ती माझी त्या वेळी झाली.

पण क्षणार्धाच्या संस्काराने मूळ स्वभाव कसा जाईल? उठल्याबरोबर गड्याने तयार करून ठेवलेला चहाचा पेला तोंडाला लावावयाची मला रोजची सवय असल्यामुळे त्या सृष्टीसौंदर्याचा माझ्या मनावर झालेला परिणाम अल्पावधीत बोथट होऊन मला चहाची आठवण झाली; पण चहा मिळणार कसा? तुकाराम–माझा खासगी गडी–आठ वाजल्याखेरीज येऊन चहा तयार करणे शक्यच नव्हते. चहा

बनवावा तर दूध नव्हते. दुसऱ्या एखाद्या विद्यार्थ्याकडून दूध आणावे असा विचार करून मी खोलीबाहेर पडलो. बाळासाहेबाच्या खोलीचे दार दहा पंधरा वेळा ठोठावले तरी त्याने ओ दिली नाही. आबासाहेबाच्या खोलीच्या दाराशी तोच प्रकार झाला. त्यात आश्चर्य नव्हते म्हणा. दोघेही सरदारपुत्र होते. ते कर्जबाजारी सरदारांचे मुलगे असले तरी श्रीमंती आळसाची व ऐदीपणाची संपत्ती त्यांनी याच वयात कल्पनेबाहेर कमाविली होती. दुसऱ्या एकदोघा मित्रांच्या खोल्यांवर मी हल्ला केला. ते जागे झाले; पण दूधच नव्हते. मी इतक्या पहाटे उठलेला पाहून दोघांनाही अत्यंत आश्चर्य वाटले. एक म्हणाला, ''जगदीश, हे रे काय? आज सूर्य पश्चिमेला उगवला की काय?'' दुसरा म्हणाला, ''जगदीश, आज सूर्याच्याऐवजी तू उगवलास होय? मला वाटतं आज सूर्य उगवणारच नाही!?'' त्याच्या चेष्टेचा मला विषाद वाटला नाही. अर्धवट हसत मी खोलीकडे आलो.

मी खोलीच्या दाराशी यावयास आणि शेजारच्या खोलीतून राधाकान्त बाहेर यावयास एकच गाठ पडली. कबीराच्या दोहऱ्यातील एकच चरण तो मोठ्या प्रेमाने आपल्या मनाशी हलक्या पण मधुर स्वरात म्हणत होता. मला पाहताच दोहऱ्याचा चरण पुरा न करता त्याने विचारले,

''कोण, जगदीश?''

राधाकान्त आमच्या वर्गातील सर्वोत्तम विद्यार्थी होता. तो यंदा बी. ए.च्या परीक्षेत पहिला येणार याबद्दल सर्वांना खात्री वाटत होती. तो अत्यंत बुद्धिमान, अत्यंत अभ्यासी व नियमित असे. तो फारसा कोणाशी मिसळत नसे; पण काय कारण असेल ते असो, त्याच्या व माझ्या अभ्यासक्रमात आणि दैनिक आचरणात अपरिमित अंतर असूनही त्याचे व माझे पुष्कळ जमत असे. मला राधाकान्तविषयी आदर वाटे व तोही माझ्याविषयी बरीच आस्था दाखवी. मी म्हटले,

''होय. रोज चार वाजता अभ्यासाला बसण्याचा तुमचा नियम आज मोडला वाटतं?''

''छे! राधाकान्तने दाराच्या कुलपात किल्ली फिरवीत म्हटले,

''रोज चार ते पाच तास अभ्यास करून थोडं हिंडून येण्याचा माझा परिपाठ आहे. आताच पुस्तक मिटून बाहेर पडलो. आज हवा मोठी सुंदर पडली आहे. येता का बाहेर फिरायला?''



दुसऱ्या कोणत्याही विद्यार्थ्याने मला हा प्रश्न विचारला असता तर मी साफ 'नाही' म्हणून उत्तर दिलं असतं. वास्तविक त्या वेळी काहीही करून चहा मिळविण्याची माझ्या मनाची इच्छा होती; पण राधाकान्तने प्रश्न करताच 'हो चला' असे शब्द माझ्या तोंडून निघून गेले व मी त्याच्याबरोबर चालू लागलो.

आम्ही नदीपर्यंत चालत गेलो व तेथे पोचल्यावर पूर्वेकडे तोंड करून एका शिलाखंडावर बसलो. तेथील सृष्टिशोभा पाहून मला फारच आनंद वाटला. राधाकान्त तर एखाद्या चित्राप्रमाणे नदीच्या पात्राकडे पाहात बसला होता. थोड्या वेळाने तो अर्धवट मनाशी व अर्धवट मोठ्याने म्हणाला, ''अहाहा! नदीची शोभा पाहायची असेल तर प्रयागला गंगायमुनेच्या संगमतीर्थावर जाऊन बसावं! या वेळी माझ्या डोळ्यांना हा देखावा दिसण्याऐवजी ज्या ठिकाणी माझी पंधरा वर्षे गेली तो प्रयागचा पवित्र नदीकाठ माझ्या डोळ्यांपुढे उभा राहात आहे. ती पहाटेची सुरम्य वेळ, दोन दिशांनी वहात येणारे ते गंगायमुनेचे भिन्नरंगी प्रवाह, ते विस्तीर्ण शुभ्र वाळवंट, भक्तिभावानं प्रवाहात बुडी घेणारे ते स्त्रीपुरुष-जगदीश, काय सांगू तुम्हाला! प्रयागातील गंगायमुनेच्या संगमाचं सौंदर्य ज्यानं पाहिलं नाही तो अभागी!''

या बोलण्यावर काय उत्तर द्यावे हेच मला समजेना. मी उत्तर द्यावे अशी राधाकान्तचीही अपेक्षा दिसली नाही. कारण, तो आपले बोलणे संपवून पुन्हा नदीच्या पात्राकडे एकाग्र दृष्टीने पाहू लागला.

राधाकान्त हा अलाहाबाद येथील एका गृहस्थाचा एकुलता एक मुलगा. मुंबई युनिव्हर्सिटीचे शिक्षण चांगले म्हणून त्याच्या वडिलांनी त्याला मुद्दाम पुण्यास पाठविलेला. तो पुष्कळ वेळ अलाहाबादचे वर्णन करी व त्याच्या तोंडचे वर्णन ऐकून मला नेहमी आनंद होत असे. या वेळीही त्याच्या तोंडचे प्रयागतीर्थाचे वर्णन ऐकून माझी वृत्ती क्षणभर गंभीर झाली.

काही वेळाने आम्ही उठून परत निघालो. राधाकान्तची गंभीर वृत्ती अजूनही पुरती मावळली नव्हती. त्याने मला प्रश्न केला,

''जगदीश, निर्मळ सृष्टिसौंदर्याचा मधुर देखावा दृष्टीस पडला, की आपल्या मनात काव्याबरोबरच तत्त्वज्ञानाचीही उत्पत्ती झाली पाहिजे असं नाही का तुम्हाला वाटत?''

मला त्याचा प्रश्न नीटसा समजला नाही आणि त्या प्रश्नाला उत्तर काय द्यावे हेही सुचले नाही. तो निर्गुण काव्याविषयी चिकित्सा करीत होता; पण मी माझ्या चालत्या बोलत्या काव्याचा-माणिकचा विचार करण्यात गढून गेलो होतो. मला प्रश्न करून त्याने जेव्हा मजकडे पाहिले तेव्हा मी माझ्या विचारातून जागृत झालो व माझे त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष नव्हते असे दाखविण्यासाठी म्हटले,

''हो.''

राधाकान्त पुढे म्हणाला, ''अप्रतिम सृष्टिशोभा पाहून मनुष्याच्या प्रतिभेला वाचा फुटते त्याच वेळी या शोभेचा कोणी तरी सर्वशक्तिमान कर्ता असला पाहिजे असा प्रत्यय त्याच्या बुद्धीला येतो. ईश्वराचं अस्तित्व मनाला पटलं, की आपलं हे आयुष्य वाटेल तसं वाया घालविण्याची मोकळीक आपल्याला नाही असं मनुष्याचं मन त्याला सांगतं.''

राधाकान्त एकदम क्षणभर थबकला व किंचित विचार करून त्याने मला विचारले, ''जगदीश, तुमचा अभ्यास कसा काय चालला आहे?''

काव्य, तत्त्वज्ञान वगैरे गंभीर विषयासंबंधी बोलता बोलता एकदम अगदी व्यावहारिक प्रश्न त्याच्या तोंडून निघालेला पाहून मी जरा चमकलो, पण लगेच, आयुष्य वाया घालविण्याच्या गोष्टीवरून त्याला माझ्या अभ्यासाचा प्रश्न सुचला असावा हे माझ्या लक्षात आले. त्याच्या मनाने जोडलेला हा संबंध मला फारसा सुखदायक नव्हता. पण गेल्या वर्षभर मी मुळी आयुष्य वाया घालविलेच होते, तेव्हा राधाकान्ताला दोष देण्यास जागाच नव्हती. मागच्या सबंध वर्षात मी पुस्तकाला स्पर्श केला नव्हता व माणिकची ओळख झाल्यापासून तर माझी विद्यार्थिदशा मी पूर्णपणे टाकून दिली होती. माझ्या व माणिकच्या प्रणयपूर्ण वृत्ती कॉलेजातील प्रत्येक विद्यार्थ्याला माहीत होत्या. बाबांनाही त्या गोष्टी कळल्या असाव्यात असा मला एकदोनदा संशय आला होता. पण मी इतका वेडावून गेलो होतो, की माणिकच्या नादात मला अभ्यासाची काही किंमत वाटेनाशी झाली होती. इतकेच नव्हे, तर माझे निवडक श्रीमंत मित्र जमले, की मी यंदा परीक्षेला बसणार नाही याबद्दल ते माझी वाहवा करीत व माणिकविषयीच्या माझ्या प्रणयपराक्रमांची स्तुती करीत. राधाकान्त मात्र एखादे वेळी मला उपदेशाचा अंकुश टोचीत असे; पण मदोन्मत्त झालेल्या हत्तीला एखादी बोच थोडीच ताळ्यावर आणणार आहे!



आताचा राधाकान्तचा प्रश्न ऐकून व त्याने आपली तीक्ष्ण दृष्टी माझ्याकडे रोखलेली पाहून मी म्हटले,

''राधाकान्त, तुम्हाला साऱ्या गोष्टी माहीतच आहेत. यंदा माझी परीक्षा पास होणं अशक्य आहे. माणिकशी विवाह झाल्याखेरीज माझं मन अभ्यासावर स्थिरावणं शक्य नाही.''

माझ्याकडे पाहून किंचित हसत राधाकान्त म्हणाला, ''हंः! ते खरं. मी तुमची पत्रिका पाहिल्यापासून मला असंच वाटू लागलं आहे. तुमची परीक्षा यंदा पास होणार नाही हे तुमची पत्रिका स्पष्ट सांगत आहे; पण तुमच्या पत्रिकेवरून माझी अशीही खात्री आहे, की तुमचं माणिकशी लग्न होणं शक्य नाही.''

मला हे त्याचे बोलणे बिलकूल रुचले नाही. मी एकदम आवेशाने म्हटले,

''हंः! आग लावा तुमच्या ज्योतिषाला! मी त्या दिवशी तुम्हाला पत्रिका दाखविली हीच चूक झाली. पाहू आता पत्रिका खोटी ठरते का.''

बोलण्याच्या आवेगात ते वाक्य तसेच अपूर्ण राहिले व मी माणिकविषयी विचार करू लागलो.

✦✦

## २

चहा पिता पिता वनभोजनासाठी काय काय पदार्थ बाजारातून आणावयाचे ते मी तुकाराम गड्याला सांगत होतो. मी आणि माणिक अशी दोघेच वनभोजनास एकटी जाणार हे त्याला कळू नये म्हणून तीन चार माणसांस लागतील इतक्या जिनसा मी त्याला आणावयास सांगितल्या.

सामानाची यादी घेऊन तुकाराम गेल्यावर मी आपला आवडीचा चिरूट पेटविला व रोजची टेनिस खेळण्याची वेळ झाली म्हणून टेनिस खेळावयाच्या वेळची विजार खुंटीवरून काढली. इतक्यात बाळासाहेब, आबासाहेब व त्यांचे एक स्नेही ऐटीने बूट वाजवीत आणि ''जगदीश, अरे जगदीश!'' असा ओरडा करीत खोलीत शिरले.

बाळासाहेब, आबासाहेब आणि मी, असे आमचे त्रिकूट साऱ्या कॉलेजात विख्यात होते. गतवर्षी ते दोघे कॉलेजच्या वसतिगृहात राहावयास आल्यापासून माझी त्यांची दोस्ती जमली होती व माझ्या उनाड आयुष्याला तेव्हापासून प्रारंभ